# जोडीदार निवडतांना

डॉ. सुजाता मोरे-चव्हाण

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# जोडीदार निवडतांना

## डॉ. सुजाता मोरे चव्हाण

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# जोडीदार निवडतांना

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जोडीदार निवडतांना

लेखिका : डॉ. सुजाता मोरे चव्हाण

९८६७९३४१०८-

Email : drsujatachavan61@gmail.com

मुखपृष्ठ- चैतन्य चव्हाण

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : २० जानेवारी २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# जोडीदार निवडतांना

डॉ. सुजाता मोरे चव्हाण

# प्रस्तावना

'विवाह' हा आयुष्यातील एक महत्त्वाचा प्रसंग तो एक मंगल सोहळा असतो. ज्यातून फक्त दोन व्यक्तीच नाहीत तर दोन कुटुंब जोडली जातात. विवाह सोहळ्याच्या स्वरूपात तसेच वैवाहिक सोहळ्याच्या स्वरूपात तसेच वैवाहिक नातेसंबंधांमध्ये काळानुरूप बरीच परिवर्तने झालेली आपण पहातोय. बदलत्या नातेसंबंधांमधून कधी कधी समस्या निर्माण होताना दिसतात. जोडीदाराच्या बद्दलच्या अपेक्षा व वास्तवता ह्यात कधी तफावत अनुभवली जाते.जोडीदार निवडतांना बर्याचदा मनात गोंधळ उडतो व त्या व्यक्तीची निर्णय घेतांना ओढाताण होते. ह्याचे परिणाम कुटुंबावरही होतात.

प्रत्येक व्यक्तीचे एक वेगळे व्यक्तीमत्त्व असते. दोन जोडप्यामधील वैवाहिक नात्यांमध्ये पण वेगळेपण असते. दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्व जेव्हा विवाह बंधनात बांधली जातात तेव्हा त्यांचे एकत्रितपणे एक तिसरे व्यक्तिमत्त्व तयार होते. ह्या नात्यात जोडीदारांना स्वातंत्र्य हवं असतं, त्याचबरोबर त्यांना एकमेकांवर अवलंबून रहाणेही हवे असते, असे हे स्वतंत्र तरीही एकमेकांत गुंतलेले हे नाते सुरळीत चालण्यासाठी दोघांनाही ह्या गोष्टीची जाण असणे

आवश्यक असते. त्याच सोबत प्रेम, आदर, विश्वास ह्या पैलुंनाही अनन्यसाधारण महत्त्व असते.

जोडीदार निवडतांनाच्या गोंधळलेल्या मन:स्थितीच्या काळात निर्णय प्रक्रियेत दिशा दाखविणारे मार्गदर्शन गरजेचे असते. विवाहपूर्व समुपदेशनाने भविष्यात येणाऱ्या नातेसंबंधांबद्दलच्या समस्या टाळणे शक्य होते. वैवाहिक नातेसंबंधाबद्दलचे प्रशिक्षण कोठेही दिले जात नाही. त्यामुळे नात्यांबद्दलची स्पष्टता नसते. तसेच हे नाते संबंध हाताळण्या साठीची कौशल्येही नसतात.निर्णय घेतांना तो सर्वांगाने विचारकरून घेतला जावा. ह्या पुस्तकातून ह्याबद्दल माहिती देण्याचा मी प्रयत्न केला आहे.

विवाहाला आपल्या समाजात अनन्य साधारण महत्त्व आहे. लग्न करतांना जोडीदार कसा निवडायचा? मग तो पहिला विवाह असो वा दुसरा. ह्या प्रयत्नांमध्ये योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाले तर अशा निर्णयाच्या वेळी त्यांना नक्कीच मदत होऊ शकते. निर्णय खूप महत्त्वाचा असतो. ह्या निर्णयाचे पडसाद दोघांवर तसेच संपूर्ण कुटुंबावर उमटत असतात. म्हणूनच जागरूकपणे हा निर्णय घ्यावा लागतो. अशा परिस्थितीत योग्य मार्ग दाखविण्याचे काम हे पुस्तक नक्कीच करू शकेल.

ही मार्गदर्शिका प्रत्येक विवाह इच्छूक व्यक्तीला उपयुक्त ठरेल अशी आशा वाटते.

ई साहित्य प्रकाशनाने हे लोकांपर्यंत पोहोचविले त्या बद्दल त्यांचे आभार!

**डॉ. सुजाता मोरे चव्हाण** **२५ डिसेंबर २०२३.**

# अनुक्रमणिका


**प्रस्तावना**

**I बदलती कुटुंब संस्था**

**II  पुरूष प्रधान समाजातील विवाह संस्था**

**III विवाह - समुपदेशन**

**IV  विवाहपूर्व  समुपदेशन**

**Vप्रश्नावली**

**VI पुनर्विवाह**

**VII  समारोप**

# I बदलती कुटुंब संस्था

समाज कधी स्थिर नसतो. कालानुसार त्यात बदल होत असतात. सामाजिक परिवर्तनाचे पडसाद समाजातील विविध संस्थांवर व नाते संबंधांवर उमटत असतात.

सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी नांगराचा शोध लागला व समाजव्यवस्था बदलून गेली. पूर्वी स्त्रिया शेती सांभाळत परंतु नांगराच्या शोधा नंतर शेती कामाची जबाबदारी पुरुषावर पडली. जमीन जिंकून आणून व जास्तीत जास्त जमिन लागवडी खाली घेऊन भरपूर धान्य निर्माण करण्याचे काम पुरुषां कडे गेले. पुढे जमिन दारी उदयास आली व त्यातूनच वारस मुलगा हवा असे वाटू लागले. जमिनदारांनी रीती, रिवाज, परंपरा निर्माण करुन स्त्रियांना एकाच पुरुषाशी शरीर संबंध करण्याचे बंधन आणणे व त्यातून विवाह-प्रथा उदयास आली. हळूहळू ही विवाह-प्रथा जमिन दारी घराण्यांतून झिरपत सामान्य जनतेत रुढ झाली.

आपल्याकडे गेल्या काही दशकांत कुटुंब संस्थेने केलेल्या प्रवासाचा आपण आढावा घेऊया.

१९६० ते१९७० : राज्यात काही ठिकाणी औद्योगिक वाढ झाली व तेथे चाकरमानी वर्ग वाढत होता. नोकरीसाठी कुटुंबाचा कर्ता शहराकडे येत

होता व कालांतराने त्याने आपल्या कुटुंबालाही आणले. शिक्षण / नोकरी साठी कोणी शहरात येत होते, आपल्या कुटुंबियांना इकडे आणून स्थिर होत होते, हळूहळू स्वतंत्र (Nuclear) कुटुंब निर्माण झाले तरीही त्यांची नाळ मूळ गावाशी व मोठ्या कुटुंबाशी तुटली नाही. सासू-सासरे, नणंद-दीर वगैरे ह्या कुटुंबाचा भागच होते. महिला शिकायला लागल्या, नोकरी करु लागल्या पण चाकोरीबद्ध क्षेत्रातच रमत होत्या, कुटुंब सांभाळून सर्व करत होत्या. विवाह व कौटुंबिक नात्यांसाठी सामाजिक नियम व बंधने मान्य केलेली होती. आंतरजातीय / आंतरधर्मिय विवाहांना मान्यता नव्हती. हे दशक संपता महिला चळवळीची सुरुवात झाली. कौटुंबिक समस्यांवर महिलांनी आवाज उठवला व महिला शक्ती समाजाला दाखवायला सुरुवात केली. तोपर्यंत कुटुंबातील समस्या कुटुंबाच्या बाहेर पडू दिल्या जात नव्हत्या.

याच दशकात हुंड्याची प्रथा बंद व्हावी यासाठी हुंडा विरोधी कायदा संमत झाला.

१९७० ते १९८० : महिला चळवळी जोमाने सुरु होत्या. महिला लेखिका, महिला साप्ताहिके, मासिके प्रसिद्धीस आली. पुरुषांच्या मानल्या जाणाऱ्या क्षेत्रात महिलांनी प्रवेश करण्यास सुरुवात केली. मुलींना शिक्षण मिळावे ह्याला समाजात मान्यता मिळाली. महिला मात्र घर, कुटुंब सांभळूनच नोकरी करत होत्या. घरातल्या सर्वांची काळजी, जबाबदारी घरातील स्त्री पार

पाडत होती. या बदलांचा परिणाम नातेसंबंधांवरही दिसून येत होता.

याच दशकात १९७८ मध्ये हिंदू विवाह कायद्यात संमतीने घटस्फोटासाठी मान्यता देण्यात आली.

१९९० ते २००० : या काळात कुटुंब पद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. कौटुंबिक समस्या हाताळण्यासाठी महाराष्ट्रात कुटुंब न्यायालय स्थापन झाली.

स्वतंत्र कुटुंब मोठ्या प्रमाणात दिसू लागली. व्यक्ति-स्वातंत्र्याला महत्त्व प्राप्त झाले. कुटुंबातील प्रत्येक जण स्वत:चे एक विश्व निर्माण करु लागला. महिला पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात पदार्पण करत होत्या. घरकाम व घरातील कामे केवळ स्त्रियांचीच का? असा प्रश्न स्त्रियांनी विचारायला सुरुवात केली. स्त्री चळवळींनी जोर धरला होता. स्त्री-पुरुष समानतेची मागणी वाढली होती. शहरात एकमेकांकडे जाणे-येणे कमी झाले. गतीमान आयुष्यामुळे नाती केवळ कागदोपत्री रहायला लागली. तांत्रिक शोधांमुळे जग जवळ आले पण केवळ 'हाय-हॅलो' करण्या पुरते संबंध राहिले. एकूणच व्यक्ती स्वातंत्र्य व आत्मकेंद्रित-पणा सर्वत्र दिसू लागले. नात्यांमधला ओलावा हळूहळू कमी होऊ लागला. ग्रामीण भागातही विकास होऊ लागला व गावांत बदल घडून आले. गावी शिक्षण व नोकरी उपलब्ध होऊ लागल्यामुळे गावातली रहाणीपण सुधारली.

विवाह टिकत नसेल तर घटस्फोट घेण्याचा पर्याय समाजाने स्विकारण्यास, कुटुंबातील समस्या चार भिंतींतच लपवून न ठेवता समुपदेशकांची मदत घेण्यास सुरुवात झाली.

२००० ते २०१० : ह्या दशकात आय.टी. सेक्टर मध्ये खूप सुधारणा झाल्या. तरुण वर्ग कॉलसेंटर मध्ये नोकरीस जाऊ लागला. कॉम्प्यूटरवर कामे होऊ लागली. तरुण-वर्गाचा जीवना कडे पहाण्याचा दृष्टीकोन पूर्णत: बदलला. घरातल्या घरातही व्यक्ती मोबाईलवरुन बोलू लागल्या. एकमेकांसाठी वेळ नाही असे प्रकर्षाने दिसून आले. नात्यांची वीण सैल होत गेली. रुढी, परस्परांना स्वीकारणे नाकारले जाऊ लागले. विवाहसंस्थासुद्धा डळमळीत होऊ लागली की काय असे वाटू लागले. विवाह पूर्व लैंगिक संबंध, कुमारी माता, डबल इन्कम, नो कीड (DINK), समलिंगी संबंध, लिव्ह इन रिलेशनशिप ह्या घटना घडताना दिसू लागल्या व त्यां प्रमाणही हळूहळू वाढतेय.

प्रसारमाध्यमे व संपर्क माध्यमांमुळे गावातही बाहेर काय चालू आहे हे समजू लागले. गाव व शहर ह्यातील रहाणीमानातला फरक कमी होत गेला. आंतरजातीय / आंतरधर्मिय विवाहांची संख्या वाढली. दाखवून / ठरवून केलेल्या विवाहांचे प्रमाण हे प्रेमविवाहांपेक्षा खूप जास्त राहिले. विवाह ठरविणे हे जेष्ठ मंडळींचे काम होते, तरुण वर्ग जेष्ठांचे ऐकत होते. एकत्र कुटुंबपद्धतीला तडा गेला व स्वतंत्र कुटुंब पद्धती जास्त प्रमाणात अस्तित्वात आली. तरीही

घरातल्या जेष्ठांच्या घराजवळ दुसरे घर घेऊन तरुणमंडळी राहू लागली. म्हणजे म्हटले तर एकत्र व म्हटले तर वेगळे. घरातल्या जेष्ठांची जबाबदारी नाकारली नाही पण स्वत:चे स्वातंत्र्यपण जपले जात होते.

२०१० पासून आजपर्यंत : आज आपल्या समाजात घटस्फोटांची संख्या वाढतेय. 'आमचे पटत नाही म्हणून आम्ही वेगळे होतोय' असे तरुण वर्गात ऐकायला मिळते. आंतरजातीय व आंतरधर्मिय विवाहांची संख्या वाढली आहे. तरुणांना "लग्न म्हणजे सात जन्माचे बंधन" मान्य नाही. आजची पिढी खूप व्यवहारी व फायदे-तोटे ह्यावरून गणित करणारी आहे. 'त्याग' त्यांना मंजूर नाही. 'मीच का माघार घेऊ?' असे पदोपदी विचारणारी आजची पिढी भावनिक पातळीवर विचार करतेच असे होत नाही. नाती हवी आहेत पण त्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजात त्यांना अडथळा नकोय. 'केअर टेकर्स' (काळजी / मदत देणाऱ्या) ची गरज वाढते आहे, ह्या व्यवसायात आता जम बसतोय. वैवाहिक समस्येंचे स्वरुप बदलत आहे. 'विवाहातील बलात्कार' ह्या संकल्पनेला मान्यता मिळवली जात आहे. पती-पत्नी ह्यातील समानतेच्या पायावर वैवाहिक नातेसंबंध असावेत असा आग्रह धरला जात आहे. स्त्रिया वेगाने प्रगती करत असतांना पुरुषवर्ग मात्र अजून तितकासा पुढे गेलेला नाहीए. आपली पत्नी शिकलेली हवी पण त्याचबरोबर संसार, परंपरा पाळणारी, रीती-रिवाज जपणारी हवी अशी अपेक्षा आजचा पुरुष वर्ग करतोय. मला वाटते की

पुरुष वर्गाला सोबत घेऊन स्त्री चळवळ पुढे चालवायची आज गरज आहे.

बर्याचदा आपण पाश्चात्यांचे अनुकरण करतोय आणि पाश्चिमात्य मात्र भारतीय संस्कृती उत्तम म्हणून ती स्विकारायला लागली आहे.

काळानुरुप समाजात बदल घडत असतात. घडणाऱ्या बदलांशी जुळवून घ्यायचे असेल तर त्यासाठी आवश्यक ती जीवन कौशल्ये आत्मसात करावयास हवीत. आपली नैतिक चौकट न बदलता आलेले बदल स्वीकारण्याची आव्हान आज आपल्या पुढे उभे आहे. विवाह संस्था / कुटुंब-संस्था ह्या समाजातील नातेसंबंधांची वीण पक्की करतात. आपली जीवनमुल्ये जाणून आपले जीवन सजगतेने जगण्यासाठी तरुण पिढी सजग असली पाहिजे तरच त्यांनी घेतलेल्या वा स्वीकारलेल्या निर्णयाच्या परिणामांना ते यशस्वीपणे सामोरे जाऊ शकूतील.

भारतीय समाजाने नेहमीच कुटुंब संस्थेला अनन्य साधारण महत्त्व दिलेले आहे. कुटुंब हा समाजाचा पाया समजून  त्याभोवताली इतर सर्व समाज घटकांनी रचना होतांना भारतात दिसते.

विवाह बंधनातून कुटुंब तयार होतं व अशा कुटुंबात विवाहातून निर्माण झालेली नाती, रक्ताची नाती वा दत्तक विधानातून निर्माण होणारी नाती, अश्या नात्यांच्या सुंदर  गुंफण्यातून कुटुंबाची वीण घट्ट होत जाते. ह्या नातेसंबंधातून निर्माण होतात एकमेकांप्रती काही कर्तव्य, तसेच काही हक्क, ज्यातून

कुटुंबातील व्यक्तिंना सुरक्षिततेची हमी मिळावी अशी अपेक्षा असते.

आज आपण जी कुटुंब संस्था,विवाह संस्था पहातोय ती ह्यापूर्वीच्या पारंपारिक व्यवस्थेपेक्षा वेगळी आहे. पारंपारिक व्यवस्थेत विवाह करताना स्वत:च्या सुखापेक्षाही आपण एक सामाजिक कर्तव्य पार पाडतोय ही भावना जास्त महत्त्वाची वाटत होती. वंशवेल पुढे वाढवली गेली पाहिजे हे विवाहाचं प्रमुख उद्दिष्टं होतं. भारतीय समाजात एकत्र कुटुंब पध्दती जास्त प्रचलित असल्यामुळे पती-पत्नींना आपणच दोघे एकमेकांचे साथीदार असल्याची भावना नव्हती. त्यामुळे पती-पत्नींना आपणच आपल्या समस्या सोडविल्या पाहिजेत अशी भूमिका घ्यावी लागत नव्हती. शिवाय पती-पत्नींच्या भूमिका समाजातील पारंपारिक मूल्यांवर आधारित ठरलेल्या होत्या. पती हा घरातील कर्ता पुरुष समजून त्याच्यावर आर्थिक जबाबदारी दिली गेली होती व कुटुंबाची देखरेख करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. पत्नीला कुटुंबात दुय्यम स्थान देऊन तिच्यावर प्रजोत्पादन व मुलांचे तसेच वयोवृद्धांचे संगोपन व घरातील कामांच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या होत्या. अशा कामांच्या व जबाबदाऱ्यांच्या स्पष्ट विभागण्यांमुळे पती-पत्नी यांच्या भूमिका स्पष्ट होत्या व त्यावर वाद निर्माण होण्याचे प्रसंग कमी होते. जर का काही वाद निर्माण झालेच तर कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती ते हाताळत होते. व कधी अतिच झाल्यास हे वाद नातेवाईकांकडून किंवा जात-पंचायतीतर्फे सोडवले जात होते.पण तेथे सुद्धा

पितृसत्ताक विचारसरणी होती. बाईच्या जातीने व पुरूषाने कसे वागावे हे सांगितले जाते .संसार टिकवण्याची जबाबदारी ही स्त्रीवर टाकली जाते.

हळूहळू शहरीकरण व समाजाच्या आधुनिकीकरणातून कुटुंब संस्थेचे स्वरूप बदलत गेले. तसेच पती-पत्नी नातेसंबंधांचे स्वरूपही बदलत गेले. कौटुंबिक समस्या कुटुंब पातळीवर किंवा जास्तीत जास्त सामाजिक पातळी सोडविण्याच्या पद्धतीही बदलत गेल्या. कारण पाश्चात्य समाजाचा पगडा भारतीय समाजावर वाढू लागला. त्यातून आर्थिक, समाजिक बदल घडत गेले. कायद्याबद्दलची जागृकता वाढत गेली. शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रियांची त्यांच्या पारंपारिक भुमिकेतून सुटका होत गेली. स्त्रियाही आर्थिक जबाबदारी स्विकारू लागल्या. स्त्री-पुरूष समानतेचे वारे वाहू लागले. कुटंब संस्था ज्या मूल्यांवर आधारित होती, त्यात आमूलाग्र बदल घडत गेल्यामुळे, पती-पत्नी यांच्या भूमिकांमध्येही बदल होण्याची आवश्यकता जाणवू लागली. एकत्र कुटुंब पध्दती ऐवजी विभक्त कुटुंब पध्दती प्रचलित होऊ लागली आणि ह्या बदलत्या काळात नवीन भूमिका स्विकारण्याच्या प्रवाहात नातेसंबंधामध्ये अस्थिरता येत गेली व सध्या आपण पहातोय की, कुटंब संस्थाच अस्थिर बनत चालली आहे.

अशा अस्थिर कुटुंबाची संख्या दिवसेंदिवस वाढत जाताना आपण पहातोय. बऱ्याच वेळा कौटुंबिक वाद विकोपाला जाऊन घटस्फोटाचे प्रमाणही

वाढताना दिसतेय. हे सगळं पहाताना असं नक्कीच मनात येतय की, कुटुंब हाच समाजाचा पाया आहे हे समिकरण आता बदलू पहातय कां?

स्थिर कुटुंब संस्थाच स्थिर समाज देऊ शकते हे मान्य केले तर असे जाणवते की कुटुंबामधील अस्थिरता कमी करून नातेसंबंध सुदृढ करणं ही आजची गरज आहे. स्त्री-पुरूष समानतेच्या मुल्यांवर आधारित कुटुंब संस्था नव्याने उभी करणं महत्त्वाचं वाटतं. समाजात समानतेवर आधारलेल्या वैवाहिक नात्यांची संख्या नक्कीच वाढायला हवी.

## II पुरूष प्रधान समाजातील विवाह संस्था

लिंग आधारित भेदभाव हे मनुष्याने निर्माण केले व पुरूषप्रधान संस्कृतीने त्याला मान्यता दिली. पुरुषप्रधान समाज मातृत्वाच्या भावनेचे उदात्तीकरण करून, स्त्रियांवर त्याच्या दायित्वाचे ओझे देऊन, त्यांच्या स्वातंत्र्याला सिमित करू पहातो.

स्त्रीच मुलांना जन्म देऊ शकते हे जिवशास्त्रीय सत्त्य लक्षात घेऊन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी पुर्णपणे स्त्रीचीच असल्याचा दावा पुरुषप्रधान संस्कृती करते. पुरुष प्रधान संस्कृती शिकवते की, कुटुंबातील कर्ता प्रमुख हा पुरुषच असतो व बऱ्याचदा वडील त्या ठीकाणी असतात.

स्त्रियांची लैंगिकता, त्यांची कामं, त्यांनी मुलांना जन्म द्यायचा की नाही, त्यांचे व्यक्तिस्वातंत्र, ह्या सर्वाचे निर्णय कुटुंबातील कर्ता पुरूष घेतो. ह्या संस्कृतीतील कुटुंब मुलीपेक्षा मुलगा जन्माला येणं ह्याला जास्त महत्त्व दिल जातं. मुलांच्या व्दारेच घराण्याची वंशवेल चालू राहू शकते हा मुख्य विचार पुरुष प्रधान संस्कृती देते.

कुटुंबातील नातेसंबंधामध्ये उतरंड तयार करणं व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पुरुषप्रधान संस्कृती वारसा पुढे चालू ठेवणं ह्यामध्ये कुटुंब संस्था व विवाह संस्था एक महत्त्वाची भूमिका निभावते. मुलांनी आक्रमक

असावं व मुलींनी प्रेमळ, काळजी घेणारी व नम्र असावं अशी ह्या संस्कृतीची अपेक्षा असते व ही मूल्य जोपासत मुलांचे संगोपन होताना दिसते. त्यामुळेच स्त्रियांवर अन्याय होणं, क्रूर वागणूकीला सामोरं जाणं , नातेसंबंधात दुय्यम महत्त्व मिळणं असे प्रकार घडताना आपण पहातो. अशा मुल्यांच्या आधारावर मुलामुलींची एक वैशिष्ठपूर्ण व्यक्तिमत्त्व तयार झालेलं असतं. त्यामुळे मुली किंवा बायका ह्या जास्त भावनाप्रधान व भावनिकरित्या आजुबाजुंच्या व्यक्तिंवर अवलंबून असतात असं दिसून येतं. स्वत:च्या मुलांच्या नवऱ्याच्या ईच्छांपलिकडे स्वत:च्या ईच्छा जपणं मान्य केल जात नाही.

स्त्रीवादी विचार सरणी ही समानतेला महत्व देते. शिवाय कोणत्याही प्रकारचा हिंसाचार नको असे म्हणते. कुटुंब तसेच लग्न ह्या सामाजिक संस्थांमार्फत पुरूषप्रधानता एका पिढीकडून पुढिल पिढीकडे संक्रमित केली जाते. आणि म्हणून स्त्रीवादी व्यक्तीला प्रचलित विवाह व कुटुंब संस्था मान्य नसते. होते काय की बर्याचदा स्त्रीवादी विचार आवडतात पण ते वैचारिक पातळीवरच रहातात व आचरणार मात्र पूर्वापारची पुरूषसत्ता येते. हे असे मुली वा मुले दोहोंत आढळते.मध्यंतरी मी स्त्रीवादी विचारसरणीच्या जोडप्यांचा अभ्यास केला. काही प्रमाणात त्यांच्यात समानता होती पण प्रमुख्याने मुलांचे / जेष्ठांचे संगोपन वा जेवण बनवणे ह्याची जबाबदारी बायकांवर आढळली. घरकामाची विभागणी खूप कमी जोडप्यांमध्ये समान पातळीवर होती. तेव्हा

मला वाटते की समानतेचे मुल्य हे लहानपणी धरातून, शाळेतून व आजूबाजूच्या परिसरातून शिकवावयास हवीत जेणेकरून तो आपल्या नित्यजीवनाचा भाग बनेल.

एखादं वैवाहिक  बंधन विस्कळीत होतं तेव्हा फक्त पती-पत्नी नातेसंबंधांवरच नव्हे तर संपूर्ण कुटुंबावर त्याचा परिणाम होताना आपण पहातो. अशा विस्कळीत कुटुंबामध्ये सगळ्यात वाईट परिणाम त्या कुटुंबातील अजाण मुलांवर होताना दिसतो. पती-पत्नींमधील वादांचा परिणाम मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास पूर्णत्वाने घडू देत नाहीत. पती-पत्नींमधे भांडणं त्यामुळे शक्यतो होऊ नयेत.

कुटुंब संस्था टिकावी ह्यासाठी प्रयत्न करणं महत्त्वाचं ठरेल, पती-पत्नींमधील बेबनाव कमी करून एक सुदृढ विवाह-बंधन पुन्हा प्रस्थापित करण्याचं काम विवाह समुपदेशनातून नक्कीच होऊ शकतं.

# III विवाह - समुपदेशन

विवाह-समुपदेशन हे 'बदल' घडवून आणण्याच्या उद्दिष्टयाने केलं जातं. हे बदल वेगवेगळ्या गोष्टींमध्ये घडवून आणणं अपेक्षित असतं जसे -

- वैवाहिक नातेसंबंध समजून घेणं . समस्या काय आहे हे समजून घेणं.

समोर कोणकोणते पर्याय आहेत हे समजून घेणे.

- व्यक्तींमधील संवाद - कौशल्य सुधारणं.
- वागणुकीतील बदलही तेव्हाच शक्य होतात जेव्हां व्यक्तींची समजून घेण्याची कुवत वाढते.स्वत: बद्दल व वास्तवाबद्दल समजून घेणे.
- स्वत:च्या भूमिकेतील, परिस्थितीतील बदल घडवून आणणं.

विवाह समुपदेशनातून नातेसंबंध सुधरविण्याचे यशस्विरित्या प्रयत्न करू शकतात.

महत्वाचे निर्णय घेण्यास मदत होते.

विवाह-समुपदेशक ही प्रशिक्षित व्यक्ती असते जी तुमच्या नातेसंबंधातील समस्या कमी करून ते सुधरवण्यास मदत करू शकते. सुरुवातीला नक्की समस्या काय आहे व कोणकोणते पर्याय आपल्यासमोर आहेत हे जाणून त्यातील आपल्यासाठी योग्य पर्याय निवडून त्यावर काम केले जाते.

भारतीय समाजात अजुनही कौटुंबिक समस्या कौटुंबिक पातळीवरच सोडविल्या गेल्या पाहिजेत, त्या चारचौघात चर्चील्या जाऊ नयेत असाच विचार केला जातो. परंतू विवाह समुपदेशकासारख्या एखाद्या त्रयस्थ प्रशिक्षित व्यक्तिशी बोलून  समस्येवर तोडगा काढण्याचा मार्ग अवलंबणं जास्त योग्य ठरतं.

तुम्हाला जेव्हा जेव्हा वाटेल की, तुम्ही तुमच्यासाठी काय योग्य ते तुम्ही ठरवू शकत नाही, महत्त्वाचे निर्णय घेऊ शकत नाही, खूप उदास वाटतय, क्रोधावर नियंत्रण ठेऊ शकत नाही, पुढे काय करावं कळत नाही,असुरक्षित वाटतय, आयुष्य संपल्यासारखं वाटतयं.... इत्यादी.. इत्यादी..... तेव्हा तेव्हा असं समजायला हरकत नाही की, तुम्हाला विशेष आधाराची व मैत्रीची गरज आहे.

समुपदेशक तुमच्या समस्या सोडवून देतील असं नाही परंतु तुमच्या समस्या स्वत:कडून सोडविण्यासाठी तुम्हाला सक्षम करू शकतील. समुपदेशक ही एक तज्ञ व्यक्ती असते जी तुम्हाला आवश्यक असलेल्या मित्रत्वाच्या

नात्याने भावनिक आधार देऊ शकतो. प्रशिक्षित समुपदेशक तुमच्या भावना समजून घेऊन प्राधान्याने कोणती समस्या हाताळणं गरजेचं आहे हे तुमच्या लक्षात आणून देऊन तुम्हाला कौशल्यपूर्ण पध्दतीने मार्गदर्शन करतील. तसेच नाती चांगल्या पद्धतीने जोपासण्यास सक्षम करतील.

विवाह हे तर असते एक पवित्र बंधन
दोन तना बरोबर दोन मनांचे हे मीलन ॥
विवाहानंतर जीवना कडे दोघे एकाच नजरेने पाहू
असली आपल्यात मतभिन्नता तरी ती सामंजस्याने सोडवू ॥
दोघांच्या भिन्न संस्कृतीतून नवीन संस्कृती निर्माण करू
आनंदाने जगण्याचे एक नवे सूत्र शोधून काढू॥
एकाच पथावर चालणारे आपण सहप्रवासी होऊ
देहाने भिन्न पण मनाने एक होऊ
एकमेकावर विसंबून असलो तरी एकमेकाना अवकाश देऊ ॥
एकमेकांच्या त्रुटींवर सामर्थ्याने मात करू
आपण सहजीवन आपले आनंदाने जगत विवाहाचे सार्थक करू ॥

# IV विवाहपूर्व समुपदेशन

विवाह हा मंगल प्रसंग. लग्नाची तयारी म्हटले की लग्ना साठी जागा जेवणाचा मेनु-अहेर- मानपान व खरेदी ह्याची धांदल उडते. वधु-वर दोघेही कल्पना विश्वात संचार करीत असतात. लग्नपद्धती, आहेर, मानपान ह्या मध्ये शारिरीक-मानसिक व सामाजिक तयारी बद्दल बऱ्याचदा दुर्लक्ष होते. लग्नानंतर मुलगी फक्त पत्नीच बनत नाही तर कोणाची तरी सून, वहिनी, काकी, मामी अशा अनेक भूमिका तिला पार पाडायच्या असतात. मुली प्रमाणेच मुला वरही विविध भूमिका बजावण्याची जबाबदारी पडते. ह्या सर्वांसाठी आधीपासूनच तयारी असली तर त्या भूमिका यशस्वीपणे पार पाडणे सहज शक्य होते.

हल्ली लग्नापूर्वी वधु-वरांच्या भेटी होऊ देणे समाजात मान्य केले जात आहे. पण ह्या भेटींमध्ये काय बोलायचे हे माहित नसल्याने बऱ्याचदा भेटीगाठी झाल्या तरी महत्त्वाची चर्चा राहूनच जाते. ह्या भेटींमध्ये त्यांनी एकमेकांना जाणून घेणे, दोघांच्या भविष्याबद्दलच्या कल्पनांची देवाणघेवाण घेणे अपेक्षित असते. नवरी मुलगी जर एकुलती एक किंवा भाऊ नसणारी असेल तर तिला आपल्या आईवडिलांचा सांभाळ करण्याची ईच्छा (वा गरज) असेल तर त्याबद्दलही पूर्ण कल्पना लग्नाआधी असणे महत्त्वाचे ठरते कारण नाहीतर

लग्नानंतर त्या मुलीची कुचंबणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या जोडीदारा बद्दलच्या अपेक्षा काय आहेत त्या चर्चिल्या जाव्यात. कोणत्याही प्रकारचे व्यंग अथवा आजार असेल तर त्याची स्पष्ट कल्पना द्यावी.

पती-पत्नींचे नाते खूपच जवळचे असते. दोघांनी एकमेकांना समजून घेऊन हे नाते फुलवावे लागते. प्रेम-विश्वास-सुसंवाद-आदर हे ह्या नात्याचे मूलभूत घटक होत. त्याग-तडजोड दोहोंकडून होण्याची गरज असते. प्रत्येक व्यक्ती मध्ये काहीतरी उणिव असते. कोणीच शंभर टक्के योग्य नसतो. आपापल्या जोडीदाराला त्याच्या/तिच्या गुणा-अवगुणांवर स्वीकारणे हे विवाह संबंधात अपेक्षित असते.

आपण 'लग्न' का करतो? हा प्रश्न प्रत्येकाने स्वत:च्या मनाला विचारावा. प्रत्येकाचे उत्तर वेगवेगळे मिळेल. कोणी म्हणेल माझ्या घरचे सांगतात म्हणून मी लग्न करत आहे, तर कोणी म्हणेल माझे वय वाढत चाले तेव्हा लग्न करावेच लागणार म्हणून मी लग्न करीत आहे. कोणाच्या मते मला आयुष्यभराचा जोडीदार हवा आहे म्हणून मी विवाहबंधनात अडकत आहे. कोणाच्या मते घरात कोणी बाईमाणूस नाही तेव्हा लग्न करायचे ठरवले. कोणाला वाटते की लग्न नाही केले तर समाज काय म्हणेल? म्हणून लग्न करीत आहे. अशी विविध प्रकारची कारणे असू शकतात आणि अशी विविध कारणे

असणे वावगेपण नाही. परंतु आपण लग्न का करतोय त्याची स्पष्टता स्वत:च्या मनात असणे तसेच ते जोडीदारासही माहित असणे महत्त्वाचे असते. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाने घरात आईला मदतीसाठी बाई हवी म्हणून लग्न केले व बायको घरात आणली. त्याची बायको करियरला महत्त्व देणारी व घरात काम करण्याची आवड नसणारी निघाली तर त्यांचा संसार कसा टिकेल? म्हणूनच लग्न करतांना आपल्या जोडीदारा बद्दलच्या अपेक्षा स्पष्ट असावयास हव्यात. लग्न करायचे हे आपण स्वत: ठरवणे महत्त्वाचे असते. आईवडिल म्हणतात म्हणून लग्न करत आहे असे असले तर लग्नानंतर जोडीदाराशी नाते जुळवतांना त्याचा त्रास होण्याचा संभव असतो. जोर-जबरदस्ती ही लग्नाच्या बाबतीत अयोग्य असते.

संसार करण्याची मनापासून तयारी हवी. संसार म्हणजे संवाद + सामंस्य + रक्षण. पती-पत्नींचे नाते साहचर्याने जास्त जवळचे बनते. दोहोंनी एकमेकांना समजून घ्यायला हवे. दोन व्यक्ती ह्या दोन वेगवेगळ्या कुटुंबातून आलेल्या असतात. त्यामुळे दोहोंमध्ये स्वभाव-आचार-विचार ह्यात तफावत ही असणारच हे मान्य करुन दोहोंना रुचणारा आचार-विचार त्यांनी स्वीकारावा लागतो. कल्पना-विश्वात रमून रहाण्याने संसार करणे शक्य होत नाही. नाटक-सिनेमांमध्ये आपण पती-पत्नीचे रोमॅन्टिक नाते बघतो पण वास्तवात तसेच

राहणे शक्य नसते.  चोवीस तास दोघांना सोबत रहावयाचे असते.  लग्ना पूर्वी व लग्नानंतर ह्यात यामुळेच फरक जाणवतो.

लग्नापूर्वी दोघे एकमेकांना आपले चांगले गुण दाखवण्याचा प्रयत्न करत असतात.  शिवाय दिवसांतून काही काळच दोघांची भेट होत असते.  लग्नानंतर मात्र सतत सोबत असल्याने सवयींची जाणिव होते.  आहार-विहार-आचार-दिनचर्या ह्यांची ओळख होते.  हे सर्व जाणून घेतांना दोहोंनी एकमेकांशी चर्चा करुन दोघांना पटणारे मार्ग शोधावयास हवेत.  नेहमी एकाच जोडीदाराने तडजोड करत रहाणे योग्य ठरत नाही.  पती-पत्नीच्या नात्यात प्रामाणिकपणा, पारदर्शकता, एकमेकांसाठी झटण्याची तयारी, एकमेकांसाठी तडजोड करण्याची ईच्छा, एकमेकां बद्दल प्रेम-आदर ह्यांची आवश्यकता असते. एकमेका बद्दलचे आकर्षण हे केवळ शारिरीक पातळीवरचे नसावे.  एकमेकांध्ये स्पर्धा नसावी.  लैंगिक जीवन हे वैवाहिक जीवनाचे एक महत्त्वाचे अंग असते. दोन्ही जण मिळून एक बनत असले तरीही दोघांचे स्वतंत्र असे विश्वही असते. लग्नसंबंधातून दोघांची वाढ व्हावयास हवी.  आनंदी समाधानी जीवन जगावयास हवे. आणखी एक गोष्ट म्हणजे प्रत्येक जण आपला जोडीदार आदर्श हवा अशी अपेक्षा करतो पण त्याचवेळी आपण स्वत: आदर्श जोडीदार आहोत का?  हे स्वत:ला विचारणे गरजेचे ठरते.  आपली स्वत:ची कुवत आपण

जाणावी, आपल्या गरजांना व आपल्या कुवतीला योग्य ठरेल असा जोडीदार निवडावा. कोणी व्यक्ती वाईट नसते. एखाद्या वेळी लग्न टिकू शकले नाही तर त्याचा अर्थ एक व्यक्ती वाईट आहे असा होत नाही. त्या दोन व्यक्तींचे एकमेकांशी जुळत नाही एवढेच! म्हणूनच लग्नापुर्वी ह्या बाबींचा सखोल विचार केला गेला पाहिजे.

आजच्या धावपळीच्या जीवनात एकूणच नातेसंबंध हे मर्यादित स्वरुपाचे होत जात आहेत. लग्ना-तील नात्याची खोली महत्त्वाची असते. ह्या नात्यांत भावनांचा कोंडमारा नसावा, सुसंवाद असावा. पैशांनी सुविधा विकत घेता येतात पण सुख नव्हे! प्रेम मिळवण्यासाठी प्रेम द्यावे लागते. वेळ, श्रम, बुद्धी खर्च करावी लागते. केवळ बुद्धी पुरेशी नसते तर कौटूंबिक व भावनिक संवेदना सुद्धा महत्त्वाची असते.

आपल्या जोडीदाराची निवड करतांना काही मूलभूत गोष्टींचा विचार करणे गरजेचे असते.

ह्या मूलभूत गोष्टी म्हणजे :

- नितीमूल्ये -एकमेकांना पूरक असावीत.
- आवड-छंद-व्यवसाय यांमध्ये समानता किंवा विविधता

असली तरी त्याबद्दल जाणीव व आदर असावा.

- स्वभाव जुळणारे असावेत.
- लग्ना बद्दलच्या अपेक्षा जुळणाऱ्या असाव्यात.
- राहणीमान-आहाराच्या सवयी, धर्म- दोहोंनी एकमेकांचा विचार करण्याची गरज.
- वास्तववादी विचारसरणी.

आपण लग्ना पूर्वी लक्षात ठेवावे की एखादा सिनेमा आवडला नाही तर तो अर्धवट सोडता येतो, एखाद्या हॉटेलचे जेवण आवडले नाही तर परत तिथे जायचे नाही असे करता येते, काळाबरोबर घरही बदलता येते, न आवडणारी माणसे टाळणे कधी शक्य होते पण अशी सुटका लग्न संबंधात सहज शक्य नसते. लग्न हे दीर्घकालीन नाते आहे अशा विचाराने ह्या संबंधांकडे पहाणे आवश्यक असते.

प्रत्येक घराला भिंती असतातच व दरवाजाही असतो. गुण हा दरवाजा व दोष ह्या भिंती. कितीही लहान घर असले तरी त्याला दरवाजा असतोच. घरात प्रवेश करतांना दरवाजातूनच जावे लागते. भिंतीतून जाण्याचा प्रयत्न

केला तर डोके आपटते.  म्हणूनच प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात प्रवेश करायचा तर तो गुणांतून करावा.

संपन्न सहजीवनाच्या बळावर कितीही संकटे/वादळे आली तरी परतवू शकणे साध्य होते.  सहजीवन हा प्रवास आहे.  तो आपण प्रयत्नपूर्वक केला तर सहजीवनाची गाडी संपन्न आनंद विधानाकडे निश्चितच पोहचू शकेल. सकारात्मक  विचार मातीचे सोने करतात तर नकारात्मक विचार सोन्याची माती करतात.

तुमच्या सहजीवनाची वाटचाल सुरळीतपणे सुरु होण्यापूर्वी  व अपेक्षित ध्येयाकडे जातांना तुमच्यासाठी एक प्रश्नावली देत आहें.

# V प्रश्नावली

---

➢ लग्न करण्यासाठी माझी मानसिक तयारी आहे का? घरच्यांच्या दबावाखाली मी लग्नाला तयार नाही ना?

➢ लग्न म्हणजे केवळ मजा नाही तर त्याबरोबर येणाऱ्या जबादाऱ्यांचे मला भान आहे ना?

➢ लग्ना कडून माझ्या काय अपेक्षा आहेत?

➢ जोडीदाराशी चर्चा करुन विचाराची देवाणघेवाण करावी वाटते का?

➢ जोडीदारा बद्दलच्या कल्पना तुमच्या मनात स्पष्ट आहेत का?

➢ स्वत:च्या स्वभावाबद्दल व चांगल्या वाईट गुणांची स्पष्ट कल्पना तुमच्या मनाला आहे का?

➢ तडजोडी साठी तुम्ही तयार आहात का?

➢ कोणत्या बाबतीत तडजोड कराल व कोणत्या बाबतीत

तडजोड करणार नाही ह्याची स्पष्टता मनात आहे का?

- ➢ लग्न केल्यावर फक्त जोडीदाराशी नव्हे तर त्याच्या कुटूंबियांशी नाते जोडणे मान्य आहे का?
- ➢ लग्नानंतर तुमच्या आचार-विचारात काही बदल करावे लागतील हे मान्य आहे का?
- ➢ जोडीदाराची त्याच्या/तिच्या कुटुंबियांशी जुळवून घेण्यासाठी काही तडजोड करावी लागली तर तुमची तयारी आहे का?
- ➢ मुलांची जबाबदारी कोणाची असणार?
- ➢ घरातल्या कामाची जबाबदारी कोणी स्वीकारावी?
- ➢ आर्थिक बाबतीत निर्णय कोणी घ्यावेत?
- ➢ दोघांच्या खाण्याच्या सवयी-रहाणीमान-सणवार साजरे करणे ह्याबद्दल काय कल्पना आहेत ?
- ➢ शाकाहारी/मांसाहारी आहाराबद्दल तुमचे मत काय?
- ➢ जोडीदाराला स्पेस द्यायची तुमची तयारी आहे का?
- ➢ सासू-सासरे-नणंद ह्या नात्यांबद्दल पूर्वग्रदूषीत मत आहे का?

- ➢ लग्ना पूर्वीच्या चुका विसरुन जाण्याची तयारी आहे व त्या जोडीदारास सांगणार का?
- ➢ जोडीदाराच्या कुटुंबियांबद्दलच्या जबाबदाऱ्या स्विकारायला तयार आहात का?

# VI पुनर्विवाह

पहिलेपण जरा नवख व वेगळे असते. लग्नाबाबतही काहीसे असेच असते. पुनर्विवाह करतांना जरा वेगळ्या गोष्टींचा विचार करावा लागतो कारण त्या वेळची आपली परिस्थिती  तसेच प्रधान्ये लक्षात घेणे खूप महत्वाचे ठरते.

आपल्याकडे पुनर्विवाहाचे प्रमाण पूर्वीपेक्षा थोडे वाढले आहे. त्यातही पुरुषांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण स्त्रीयांपेक्षा जास्त आढळते. बऱ्याचदा पुनर्विवाह हे सोयीकरता किंवा घरातल्या व्यावहारिक अडचणींना उत्तर म्हणून केला जातो. पुनर्विवाह करावा की नाही ह्याचा निर्णय विवाह करणाऱ्या व्यक्तीने स्वत: घ्यावा. ह्या नात्यातून आपल्याला काय हवे आहे ह्याचा विचार करुन त्याप्रमाणे जोडीदार निवडावा.

पुनर्विवाह करतांना पुढील गोष्टींचा प्रमुख्याने विचार करावा:

आपले वय, लग्न करण्याची कारणे, जोडीदाराकडूनच्या अपेक्षा, पहिल्या लग्नाचा कालावधी आणि आठवणी, अपत्ये असल्यास ते कुठे आहेत आणि लग्नानंतर त्याच्यावर होणारे परिणाम, अपत्याची पुनर्विवाहाबद्दल होणारी प्रतिक्रिया, कौटुंबिक परिस्थिती आणि कुटुंबियांच्या पुनर्विवाहाबद्दल होणाऱ्या प्रतिक्रिया, नवीन नात्यासाठी शारिरिक सामाजिक - मानसिक तयारी.

दुसऱ्या लग्नाच्यावेळी आपला भूतकाळ आपल्या सोबत असतो तो नाकारता येत नाही.

नव्या संसारात गुंतताना होणारे बदल नव्या उत्साहाने स्वीकारावे लागतात. भूतकाळात अडकून राहून नवीन नात्यात आनंदाने जगणे कठिण होते. पहिल्या लग्नाचा कालावधी, अपत्ये आहेत का आणि ते कोणाकडे रहातात, अपत्याचे वय, पुनर्विवाहाची कारणे, लग्न करणाऱ्याचे वय, कौटुंबिक पार्श्वभूमी, दुसऱ्या लग्नाबद्दलच्या अपेक्षा ह्या विविध घटकांवर पुनर्विवाहानंतरच्या नात्याचे स्वरुप अवलंबून असते. लहान मुलापेक्षा किशोर वयातील व तरुण वयातील मुले असतील तर त्यांच्या आई / वडिलांच्या पुनर्विवाहाच्या वेळी त्यांच्याशी जुळवून घेण्याचे मोठे आव्हान असते. पुनर्विवाहाच्या निर्णयाची कल्पना त्यांना योग्य वेळी द्यावी तसेच लग्नाच्या निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग असावा. मुलांशी मोकळेपणे बोलावे.

तसे पाहिले तर दुसरा संसार हा पहिल्या संसारात केलेल्या चुका किंवा कमतरता भरुन काढण्याची संधी आहे असा विचार करायला काय हरकत आहे?

# VII समारोप

कुटुंबात एकसंधता असण्यासाठी काही घटकांची गरज असते. जसे की, समान विचार, भाषण - संवाद, समान खाद्य संस्कृती, भक्ती मार्गाचा स्वीकार आणि समान श्रद्धास्थाने. प्रत्येक व्यक्तीचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोण ठरवलेला असतो. आयुष्यात कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यायचे हे सुद्धा ठरवलेले असते. कुटुंबियांमधे सर्वांचे जीवनविषयक दृष्टिकोण आणि प्राधान्यक्रम जर एकमेकांना जुळणारा वा पूरक असेल तर कुटुंबात वादविवाद झाले तरी भांडणे होण्याची शक्यता कमी असते. मतभेद हे दोन व्यक्तीमधे होतीलही कारण प्रत्येक व्यक्तीची स्वत:ची मते असतात. कुटुंबात मतभेद झाले तरी मनभेद होणार नाहीत ह्याची काळजी प्रत्येकाने घ्यावी लागते.

मानवाच्या गरजा ह्या वेगवेगळ्या असतात. उतरंडीच्या स्वरुपात मांडायच्या तर असे म्हणता येईल की,

बौद्धिक गरजा.

उत्तमता

स्वत्त्व

स्वाभिमान

प्रेम

सहवास

भावनिक गरजा सुरक्षिततेच्या गरजा.

आर्थिक, सामाजिक आणि शारिरिक मुलभूत गरजा.

शारिरिक गरजा : अन्न, पाणी, निवारा, वस्त्र

प्रत्येकाच्या गरजा वेगळया असू शकतात. सामान्यपणे मुलभूत आणि सुरक्षिततेच्या गरजा भागल्या की सामान्य व्यक्ती समाधानी असते. काही व्यक्तींना बौद्धिक गरजा जास्त महत्त्वाच्या वाटतात ,अशा व्यक्ती लिखाण - वाचन- नवीन कला शिकणे अशा गोष्टींना प्राधान्य देतात. प्रत्येक व्यक्ती कोणत्या गरजांना प्राधान्य देते हे जाणून घेणे महत्त्वाचे असते. दोन व्यक्ती जेव्हा नात्यात बांधल्या जातात तेव्हा याच्या प्रत्येकाच्या गरजांबद्दल काय प्राधान्यक्रम आहे हे समजून घेतल्यास ते नाते जास्त चांगले फुलू शकते.

सांपत्तिक स्थिती, शिक्षण, नोकरी, रुप ह्या बाबी तशा दुय्यम असतात.

सहवास, प्रेम, आपुलकी, व्यक्तिस्वातंत्र्य,एकमेकांच्या मनाचा आणि भावनांचा आदर ह्या बाबी जर जपल्या तर दोहोतील नाते घनिष्ट बनते आणि मग कितीही मोठ्या समस्या उभ्या राहिल्या तरी दोघे एकत्रित पणे त्यावर मात करु शकतात, त्यातून यशस्वीपणे मार्ग काढू शकतात.

# सुखी संसाराचे prescription

आयुष्याच्या सुरवातीला असते education
नंतर मिळत जाते हळूहळू satisfaction.

मुहुर्ताच्या क्षणी असते decoration
त्या पाश्वभूमीवर पार पडते लग्नाचे celebration .

जर नवरा बायकोंमध्ये असेल cooperation
व
असेल घरातील सर्वांमध्ये  communication
तर ,
मजबूत होत जाते संसाराचे foundation
व
कधीच होत नाही perforation.

पण

जर का सुरू झाले narration

व

अवगुणांचे presentation,

तर

कच्चे होत जाते संसाराचे construction

आणि येते depression.

संसारात असावे calculation.

सर्व जबाबदार्यांचे distribution.

म्हणजे मिळते satisfaction.

मग उरत नाही कोणतेही tension .

माझ्यामते,

हेच तर आहे सुखी संसाराचे prescription

.========================================




# Dr Sujata More-Chavan,

**Assistant Professor**.

BSc. MA,MSW.
PGDip(Human Rights)
PhD(LAW),

India (t) +91 98679 34108

drsujatachavan61@gmail.com

sujata.chavan@tiss.edu

## Professional Experience:

- Tata Institute of Social Sciences, Mumbai
  Asst. Professor.(November 2013-Present)
- Family Court, Mumbai
  Marriage Counsellor (October 1989-November 2013) (24 Years)
- Tata Memorial Hospital, Mumbai
  Head of Social Work Department (November 1986-September 1989)
- GT Hospital, Mumbai
  Medical Social Worker (January 1984 - November 1986)
- Plastic Surgery Dept., KEM Hospital, Mumbai
  Speech Therapist (June 1983 - January 1984)
- Paediatrics Dept., KEM Hospital, Mumbai
  Medical Social Worker.
  (May 1983 – January 1984)

# Publications

- Speech Therapy for Cleft Lip and/or Cleft Palate (1986, Republished 1998).

  [ Marathi, English, Hindi, Gujarati]

- Role of Medical Social Worker in a Hospital Setup (1986) [English]
- Therapies for Cancer Patients (1988) [English]
- Role of Marriage Counsellor in a Judicial Setup (1993).[English]
- Notes on Hindu law for LLM Students (1996).[English]
- “Vihahawed” : Marriage Counselling (2000, Granthali Publication). [Marathi]
- “Saptapadi “: Pre Marriage Counselling (2011). [Marathi]
- Dos and Don’ts for Parents with Matrimonial Disputes (2013). [English]
- “Custody of Children in Matrimonial Disputes” (2017, Studium Press).[English]
- “वैवाहिक नातेसंबंध”, 2021.विचक्षण प्रकाशन.

  available on play.goggle.com ( ISBN. 978-93-86740-44-1)

# डॉ. सुजाता मोरे चव्हाण यांची ई साहित्यवरील पुस्तके

- “खाऊ आनंदे”, 2016.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/khaoo_anande_sujata_rajeshri.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chatani_sujata_rajeshri.pdf

- “वाचादोषावर मात : ओठ व टाळू त्यांचे व्यंग”, 2016

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vachadosh_sujata_chavan.pdf

- Family Court - Act and Procedure (1993, Republished 2016, esahitya Publication) [Marathi]

“ कुटुंब न्यायालय “, 2017

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kutumb_nyayalay_sujata_chavan.pdf

- “संकलन अनुभवांचे”, 2018

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sankalan_sujata_chavan.pdf

- “Khau Anande. Chatni special ”, 2018,

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chatani_sujata_rajeshri.pdf

- “Trainer’s manual on communication skills” (2018, Studium Press). [English]इच्छापत्र / मृत्युपत्र (WILL)(कायदेविषयक)., 2019

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/will_sujata_chavan.pdf

- हिरकणी ( सामान्य मातांच्या असामान्य कथा).,2019.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/hirkani_sujata_chavan.pdf

- “परिचारिका. आरोग्यसेवेचा कणा”., 2020

https://www.esahity.in/images/book_name/Paricharika_SaralaB_SujataC.pdf

- “ वैवाहिक सहजीवनाचा प्रवास”, 2020

https://www.esahity.in/images/book_name/Vaivahik_Sahapravas_Sujata%20More%20Chavan.pdf


- “समाजशास्त्रीय संशोधन “, 2020.


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sss_scm.pdf


- तोतरेपणा- २०२२

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/totarepana_sujata_more_chavan.pdf


==================================



वैवाहिक
सहजीवनाचा
प्रवास



डॉ. सुजाता चव्हाण
कुटुंब न्यायालय


सर्वसमावेशकता
स्वावलंबनाचा हक्क
डॉ सुजाता मोरे चव्हाण



सामाजिक शास्त्रातील संशोधन
सामाजिक शास्त्रातील संशोधन
Research in Social Sciences



सरला भावसार
परिचारिका
आरोग्यसेवेचा कणा



डॉ. सुजाता चव्हाण
इच्छापत्र
मृत्युपत्र
(WILL)
LAST WILL
AND
ESTAMENT



हिरकणी


खाऊ आनंदे
डॉ. सुजाता चव्हाण
राजेश्री शिंपी


डॉ. सुजाता चव्हाण
राजेश्री शिंपी
खाऊ आनंदे


वाचादोषावर मात
ओठ व टाळू यांतील व्यंग
डॉ. सुजाता चव्हाण


तोतरेपण
एक वाचादोष
डॉ सुजाता मोरे चव्हाण


बोलणे शिकावे लागते
वाचादोष व उपचार
डॉ सुजाता मोरे चव्हाण